


महाराष्ट्र टाइम्स आणि विवेकानंद कॉलेजच्या संयुक्त विद्यमाने गुरुवारी मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. हिमांशू स्मार्त. शेजारी डॉ. बी. के. गोसावी, डॉ. आय. जी. शेख. दुसऱ्या छायाचित्रात उपस्थित विद्यार्थिनी.

# भाषा जगता आली पाहिजे

## डॉ. हिमांशू स्मार्त; मटा, विवेकानंद कॉलेजतर्फे कार्यक्रम

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'शब्दांचा ऱ्हास म्हणजे संस्कृतीचा ऱ्हास असतो. एखादा शब्द आपल्या भाषेतून कालबाह्य होतो, याचा अर्थ जगण्याची एखादी व्यवस्था संपते. भाषेचे संवर्धन करण्यासाठी केवळ कर्मकांड उपयोगाचे नाही. भाषा जगता आली पाहिजे,' असे मत नाटककार डॉ. हिमांशू स्मार्त यांनी व्यक्त केले. मराठी राजभाषा गौरव दिनाच्या निमित्ताने 'महाराष्ट्र टाइम्स' आणि विवेकानंद कॉलेजच्यावतीने गुरुवारी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यानिमित्त विवेकानंद कॉलेजमध्ये 'मटा' आणि विवेकानंद कॉलेजच्या मराठी विभागातर्फे पुस्तक प्रदर्शन, व्याख्यान झाले.

'मराठी भाषेतील विकासाच्या नव्या दिशा' या विषयावर बोलताना डॉ. स्मार्त म्हणाले, 'शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या मराठी भाषेचे संवर्धन करण्याची वेळ यावी हे दुर्दैवी आहे. ही वेळ इतर भाषिकांमुळे नव्हे तर मराठी भाषिकांमुळेच आली आहे. मराठीकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन नकारात्मक आहे. वैयक्तिक पातळीपासून ते सरकारी यंत्रणांपर्यंत सर्वत्र केवळ भाषेविषयी कर्मकांड केले जात आहे. दिन साजरे करण्यास विरोध नाही. पण हा जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न आहे. वैयक्तिक पातळीवर दिवसभरात आपण किती मराठी शब्दांचा वापर करतो? याचे चिंतन करा. मराठी भाषेत शेकडो शब्द आहेत, पण काही मोजक्या शब्दांवरच आपला दिवस पार पडतो. अनेक शब्दांचा वापर टाळून आपण भाषेची श्रीमंती मारतो. भाषा टिकवण्यासाठी ती समरसून जगता आली पाहिजे. भाषेतील साहित्य, संगीत, कला यांचा आस्वाद घेतला पाहिजे, तरच भाषा आपल्या जगण्याचा भाग होते.'

प्रत्येकाने भाषेचा जास्तीतजास्त वापर करणे हीच तिच्या विकासाची सर्वात महत्त्वाची दिशा असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. भाषा उपजीविकेचे साधन बनत नाही, याबद्दल खंत व्यक्त केली. यासाठी सरकारी पातळीवर धोरणात्मक निर्णयाची गरज त्यांनी व्यक्त केली.

### विद्यार्थ्यांचा केला गौरव

मराठी भाषा संवर्धन पंधरवड्याच्या निमित्ताने मराठी विभागाने कॉलेजमध्ये निबंधलेखन, शुद्धलेखन, काव्यलेखन, वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन केले होते. या स्पर्धेत यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना कार्यक्रमात प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

मराठी विभागप्रमुख डॉ. बी. के. गोसावी यांनी मनोगतातून मराठी भाषेची सद्यस्थिती मांडली. निवृत्त प्रा. डॉ. आय. जी. शेख यांनी मनोगतातून मराठी भाषेचे सौंदर्य स्पष्ट केले. प्रा. डॉ. शर्मिला घाटगे यांनी स्वागत केले. प्रा. डॉ. प्रदीप पाटील यांनी आभार मानले.

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR 416003

सोलापूर | कोल्हापूर | अकोला | गोवा येथून एकाच वेळी प्रकाशित । आर. एन. आय. रजिस्ट्रेशन क्र. ६९८६५/१९९८ । वर्ष : २२ अंक : १२ www.facebook.com/lok

महाराष्ट्राचा मानबिंदू

# लोकमत

पृष्ठे : १२+८ = २०, किंमत : ₹ ४.०० कोल्हापूर, सोमवार, दि. १३ जानेवारी २०२०

# खांडेकर मराठीतील मानवतावादी लेखक

## विनय हर्डीकर : विवेकानंद कॉलेजमध्ये भाऊसाहेब खांडेकर व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : खांडेकर हे संयमी, संवेदनशील, प्रतिभावंत लेखक होते. त्यांनी कधीही मोठेपणा मिरविला नाही आणि आपल्या दुर्दैवाचे भांडवल कधी केले नाही. ते प्रत्येक विषयावर मौलिक भाष्य करणारे लेखक होते. वि. स. खांडेकर हे मराठीतील मानवतावादी लेखक आहेत, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत विनय हर्डीकर यांनी केले.

विवेकानंद कॉलेज (स्वायत्त) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे शनिवारी कै. भाऊसाहेब खांडेकर व्याख्यानमालेअंतर्गत 'वि. स. खांडेकर यांचे जीवन व साहित्य' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.



कोल्हापुरातील विवेकानंद कॉलेज (स्वायत्त), शिवाजी विद्यापीठ यांच्यातर्फे शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे स्मृतिभवन येथे भाऊसाहेब खांडेकर व्याख्यानमालेत विनय हर्डीकर यांनी मार्गदर्शन केले. डावीकडून प्रा. भाऊसाहेब गोसावी, डॉ. सुनीलकुमार लवटे, प्राचार्य अभयकुमार साळुंखे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे होते.

विनय हर्डीकर म्हणाले की, वि. स. खांडेकर यांच्या साहित्यातून समाजाबद्दलची करुणा आणि आस्था प्रकट होते. त्यांचे साहित्य हे सामाजिक जीवनाची बांधीलकी जतन करणारे व प्रेरणादायी होते. प्रत्येक माणसात ईश्वराचा अंश असतो, असे मानणाऱ्यांपैकी ते लेखक होते. अज्ञान, अंधश्रद्धा, जातिव्यवस्था, अध्यात्माचा बागुलबुवा, विज्ञानाचा अभाव असणाऱ्या समाजाला त्यांचे साहित्य दिशादर्शक होते. त्यांचे साहित्य जीवनवादी होते.

अध्यक्षीय मनोगतात संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे म्हणाले, स्वातंत्र्यपूर्व काळात अशाच क्रांतिकारी साहित्यातून त्यांनी समाजजागृती करण्याचे काम केले. त्यांची लेखणी तलवारीसारखी होती. त्यांच्या साहित्याने समाजात मोठा बदल घडून आलेला आपणास पाहावयास मिळतो. प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रम समन्वयक व मराठी विभागप्रमुख प्रा. भाऊसाहेब गोसावी यांनी आभार मानले. प्रा. डॉ. प्रभावती पाटील यांनी सूत्रसंचालन केले. ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सुनीलकुमार लवटे, लेखक बाबासाहेब पाटील व मान्यवर प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी यावेळी उपस्थित होते.

VIVEKANAND COLLEGE
ESTD. JUNE 1964
KOLHAPUR-416003